दिव्य मराठी
यवतमाळ 11-09-2025

# साहित्य अकादमीतर्फे मुसळे, कवी शिरसाट यांना निमंत्रण

प्रतिनिधी | वाशीम

नवी दिल्ली येथील साहित्य अकादमी आयोजित साहित्य मंचमध्ये वाशीम येथील लेखक बाबाराव मुसळे व कवी मोहन शिरसाट यांना आमंत्रित करण्यात आले आहे. या साहित्य मंचचे आयोजन साहित्य अकादमी आणि श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यपान विद्यमाने डॉ. पंजाबराव देशमुख सभागृहामध्ये दि. १९ सप्टेंबर रोजी सकाळी दहा वाजता करण्यात आलेले आहे.

साहित्य अकादमी ही देशातील २४ भाषांमध्ये प्रतिष्ठेचे अकादमी पुरस्कार देते आणि पुस्तके प्रसिद्ध करीत असते. तसेच देशभर साहित्योत्सव आयोजित करीत असते. प्रादेशिक प्रतिभावंत साहित्यिकांना व्यासपीठ मिळावे यासाठी भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाच्या अंतर्गत 'साहित्य मंच' या कार्यक्रमाचे आयोजन केले जात असते.

अमरावती येथील 'साहित्य मंच' कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मराठीतील सुप्रसिद्ध कवी प्रा. नारायण कुळकर्णी कवठेकर भूषविणार आहेत. तसेच वाशीम येथील कथा-कादंबरीकार बाबाराव मुसळे, अमरावती येथील सतीश तराळ कथाकथन करणार आहेत. तसेच या कार्यक्रमात अमरावती येथील कवयित्री डॉ. शोभा रोकडे, वाशीम येथील कवी मोहन शिरसाट कविता सादर करणार आहेत.